**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्यांच्या मदतीसाठी राज्य सरकारकडून केंद्र सरकारला प्रस्ताव

- विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर दरम्यान नागपूरमध्ये

- समाज माध्यमांचा दुरुपयोग आणि फेक न्यूज प्रकरणी कठोर कारवाईची गरज असल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्र्यांचं लोकसभेत प्रतिपादन

**आणि**

- ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांचं निधन

**<><><><><>**

राज्यात अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्यांच्या मदतीसाठी केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारनं प्रस्तावच पाठवला नसल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. संसदेच्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात ही बाब उघड झाल्याचा दावाही विरोधकांकडून केला जात होता. मात्र, तारांकित प्रश्न हे ३५ दिवसांपूर्वी दाखल केले जातात, याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधलं आणि कृषीबद्दलचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली.

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस***

**<><><><><>**

देशभरात यंदाच्या खरीप हंगामात ११६ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावरच्या पीकाचं नैसर्गिक आपत्तीमुळं नुकसान झाल्याची माहिती केंद्र सरकारनं काल लोकसभेत दिली. २७ नोव्हेंबरपर्यंतच्या या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातल्या सुमारे साडे ७५ लाख हेक्टर क्षेत्रावरच्या पीकांचा यात समावेश आहे. केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी लोकसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली.

**<><><><><>**

मुंबईत ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह बोगद्याच्या कामाला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी टीबीएम अर्थात बोगदा खोदणाऱ्या यंत्राचं लोकार्पणही करण्यात आलं. पूर्व द्रुतगती महामार्गापासून पश्चिम भागात जाण्यासाठी होणारी वाहतूक कोंडी तसंच, नवी मुंबई भागात जाण्यासाठी लागणारा लांबचा पल्ला कमी करण्यासाठी ऑरेंज गेट बोगद्याची संकल्पना करण्यात आली, असं मुख्यमंत्री या उद्घाटनावेळी म्हणाले. या बोगद्यामुळे पूर्व द्रुतगती महामार्ग पश्चिमेला असणाऱ्या किनारी मार्गाला जोडणं शक्य होणार आहे. हा बोगदा भूमिगत असून तो पश्चिम आणि मध्य रेल्वे वाहिनी तसंच,सध्याच्या मेट्रो ३ प्रकल्पाच्याही ५० मीटर खालून तो जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला ८ डिसेंबरपासून नागपूर इथं सुरूवात होणार आहे. मुंबईत विधानभवन इथं आज विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली, यात हा निर्णय झाला. हे अधिवेशन १४ डिसेंबरपर्यंत चालेल. १३ डिसेंबर, शनिवारी आणि १४ डिसेंबर, रविवारी शासकीय सुट्टीच्या दिवशीही सभागृहाचं कामकाज होणार आहे. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषद सभापती राम शिंदे उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातल्या २२२ नगरपालिकांसाठी काल मतदान झालं.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात सरासरी ७४ पूर्णांक ३५ शतांश,

**जालना** जिल्ह्यात ७३ पूर्णांक ७६ शतांश,

**हिंगोली** नगरपरिषदेसाठी ६६ पूर्णांक २५ शतांश, तर **कळमनुरी**साठी ७२ पूर्णांक ८१ शतांश,

**लातूर** जिल्ह्यात उदगीरमध्ये ६८ पूर्णांक १२ शतांश, अहमदपूरमध्ये ७३ पूर्णांक ६ शतांश, तर औसा इथं ७५ पूर्णांक ७३ शतांश,

**कोल्हापूर** जिल्ह्यात १० नगरपरिषदा आणि ३ नगरपंचायतींसाठी सरासरी ७८ पूर्णांक ८७ शतांश,

**रत्नागिरी** जिल्ह्यात ४ नगरपरिषदा आणि ३ नगरपंचायतींसाठी ६८ पूर्णांक १४ शतांश,

**नांदेड**मध्ये ७४ पूर्णांक ७५ शतांश,

**वाशिम** जिल्ह्यात ६५ पूर्णांक ४७ शतांश,

**धाराशिव** जिल्ह्यातल्या ८ नगरपालिकांसाठी ६८ पूर्णांक ९७ शतांश,

**जळगाव**मध्ये ६५ पूर्णांक ५६ शतांश,

**गडचिरोली**त ७० पूर्णांक ६ दशांश,

**अहिल्यानगर**मध्ये ७२ पूर्णांक २५ शतांश,

**सांगली**त ७५ पूर्णांक ९६ शतांश,

**बुलडाण्या**त ६९ पूर्णांक ४२ शतांश,

**रायगड**मध्ये ७० पूर्णांक २६ शतांश,

तर, **सोलापूर** जिल्ह्यात १० नगरपरिषदांसाठी ६७ टक्के मतदानाची नोंद झाली.

राज्यातल्या सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी येत्या २१ डिसेंबरला करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं काल दिले. सुरवातीच्या कार्यक्रमानुसार या सर्व जागांसाठीची मतमोजणी आज होणार होती.

**<><><><><>**

संचार साथी या ॲपमुळे खासगी आयुष्यात ढवळाढवळ होण्याचा किंवा नागरिकांवर लक्ष ठेवण्याचा कोणताही धोका निर्माण होत नसल्याचं स्पष्टीकरण सरकारनं दिलं आहे. उलट, यामुळे फसवणुकीचे प्रकार टाळणं, हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोन ब्लॉक करणं, आपल्या नावावरची मोबाईल कनेक्शन तपासून अनधिकृत कनेक्शन रिपोर्ट करणं, मोबाईल हँडसेट खरा आहे किंवा नाही, हे तपासणं इत्यादी गोष्टी करणं नागरिकांना सोपं होईल, असं सरकारनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

ज्या समाजात दिव्यांग व्यक्तींना समानतेची वागणूक दिली जाते, त्याच समाजाला खऱ्या अर्थानं विकसित म्हणता येईल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं.

दिव्यांग सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. दिव्यांगजनांनी विविध क्षेत्रांमध्ये, विशेषतः खेळांमध्ये मिळवलेलं यश म्हणजे सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत असल्याचं सांगून गेल्या वर्षीच्या पॅरालिम्पिक्समध्ये २९ पदकं पटकावणाऱ्या भारतीय चमूचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी लोकसभेत सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली. समाज माध्यमांचा दुरुपयोग आणि फेक न्यूजचा विषय अत्यंत गंभीर असून या दोन्ही बाबींवर तसंच एआयनिर्मित आक्षेपार्ह आशयांवरही कठोर कारवाई करणं गरजेचं आहे, असं केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आज लोकसभेत म्हणाले. प्रश्नोत्तराच्या तासात या संदर्भात विचारलेल्या  प्रश्नावर ते उत्तर देत होते.

देशभरातली जवळपास शंभर टक्के रेशन कार्डं आता डिजिटल रुपात तयार झाल्याची माहिती केंद्रीय अन्न, सार्वजनिक वितरण आणि ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्याचा पुरवठा केला जात असून ही योजना २०२९पर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती जोशी यांनी यावेळी दिली.

**संचार साथी** या ॲप्लिकेशनद्वारे हेरगिरी करणं शक्य नसून अशा प्रकारे कोणतीही हेरगिरी होणार नाही, अशी ग्वाही ज्योतिरादित्य शिंदे यांनी लोकसभेत दिली. वापरकर्ते त्यांच्या सोयीनुसार हे ॲप्लिकेशन सक्रिय किंवा निष्क्रीय करू शकतात तसंच त्यांच्या फोनमधून ते हटवू देखील शकतात. सायबर फसवणुकीपासून संरक्षणासाठी या ॲप्लिकेशनची निर्मिती झाल्याचं शिंदे आपल्या उत्तरात म्हणाले. या ॲपच्या माध्यमातून दीड कोटी फसव्या मोबाईल जोडण्या तोडण्यात आल्या असून चोरीला गेलेले २६ लाख मोबाईल फोन शोधण्यात आल्याचंही शिंदे म्हणाले.

**शालेय** स्तरावर नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्यासाठी अटल नवोन्मेष धोरणांतर्गत सरकार देशातल्या शाळांमध्ये ५० हजार नवीन अटल टिंकरिंग प्रयोगशाळांची स्थापना करणार आहे, असं माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज राज्यसभेत

प्रश्नोत्तराच्या तासावेळी पुरवणी प्रश्नांच्या उत्तरात सांगितलं. समग्र शिक्षा अभियान, राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रम आणि प्रधानमंत्री श्री ही धोरणं एकमेकांशी संबंधित आहेत, असं प्रधान यावेळी म्हणाले.

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात संयुक्त रणनीतीवर चर्चा करण्यासाठी आज विरोधी पक्षांच्या नेत्यांनी संसदेत बैठक घेतली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पार्टी, झारखंड मुक्ती मोर्चा, सीपीआय एम, सीपीआय यासह विविध पक्षांचे नेते बैठकीला उपस्थित होते. मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षण संदर्भात तसंच, संसदेचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी या बैठकीत चर्चा झाली.

दरम्यान, नवीन कामगार कायद्यांना विरोध करत विविध पक्षांच्या नेत्यांनी आज संसद भवनाबाहेर निदर्शनं केली. कामगार कायद्यातल्या तरतुदी कामगार हिताच्या विरोधी असून त्या मागे घेण्यात याव्यात, अशी मागणी या नेत्यांनी केली आहे.

<><><><><>

राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष पन्नालाल सुराणा याचं काल निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांचं आज देहदान करण्यात आलं. पन्नालाल सुराणा हे दैनिक मराठवाडा या वृत्तपत्राचे माजी संपादक होते. ग्रामोदय समिती कुर्डवाडीचं अध्यक्षपदही त्यांनी भूषवलं होतं. दुष्काळ निवारण, शेतकरी-शेतमजुरांच्या हक्कासाठी त्यांनी आंदोलने केली. समाजवादी विचारवंत, साहित्यिक आणि उत्तम वक्ता अशीही त्यांची ख्याती होती. १९९३ सालच्या भूकंपानंतर त्यानी नळदुर्ग गावात ‘आपलं घर’ नावाचा मोठा प्रकल्पही उभारला होता.

राज्याच्या समाजकारण आणि राजकारणातील निस्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड गेला आहे. या शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या दुसरा सामना रायपूर इथं सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २१ षटकात २ बाद १२३ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//